जिल्हा परिषद, उस्मानाबाद
सामान्य प्रशासन विभाग
२२ MAR 2019

संचालनालय
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
"भूजल भवन" शिवाजीनगर, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००५
Tel : २५५१३७१६/२५५१३७१७/२५५१३७१८, Fax :९१-०२०-२५५३३१०८ e-mail : cde.gsda@gmail.com

जा.क्र. आवेधन/कक्ष-२/स्वजल कार्यक्रम/पं.क्र. २७ / ८९८ /२०१९ , दिनांक : 8 MAR 2019

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,
उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार, वाशिम.

विषय :- " स्वजल " प्रकल्पांतर्गत सौर उर्जेवर आधारीत लघु नळ पाणी पुरवठा योजना राबविणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक - स्वजल-२०१९/प्र.क्र.२५/पापु-१०, दि. २६ फेब्रुवारी, २०१९
२) संचालनालयाचे पत्र क्र. आवेधन/कक्ष-२/स्वजल कार्यक्रम/पं.क्र.२७/ ८९७ /२०१९, दिनांक ८/३/२०१९

पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार यांचेद्वारे स्वजल प्रकल्पांतर्गत समुदाय आधारीत एकलगाव सौर ऊर्जेवर आधारीत लघु नळ पाणी पुरवठा योजना राबविणेकरीता महाराष्ट्रातील उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार व वाशिम या जिल्हयांची निवड करण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणा म्हणुन भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखालील सौर योजनेकरीता अस्तित्वात असलेल्या जिल्हास्तरीय समितीस जिल्हा स्वजल प्रकल्प समिती म्हणुन नामनिर्देशित करण्यात आले आहे.

त्यानुसार स्वजल प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणी करीता संदर्भ क्र. २ नुसार सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या जिल्हयामध्ये निकषानुसार योग्य गावांकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेवुन योग्य गावाची निवड करुन, सदर प्रस्ताव संचालनालय, भू.स.वि.यं., पुणे यांचेकडे मंजूरीस्तव सादर करावेत.

(श्री.कौस्तुभ दिवेगावकर, भा.प्र.से.)
संचालक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :- १. मा.विभागिय आयुक्त , नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार, वाशिम यांना माहितीस्तव.
३. उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ०१ यांना माहितीस्तव.
३. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो) बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव.
४. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहितीस्तव.
५. मुख्य खोदन अभियंता, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे / अमरावती यांना माहितीस्तव.
६. वरिष्ठ खोदन अभियंता, नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
७. उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार, वाशिम. यांना माहिती कार्यवाहीस्तव.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
आवक क्रमांक
दिनांक

D:\1-4-2018 Correspondens Drilling Final Draft Swjal Pariptrak



Scanned by CamScanner

स्वजल प्रकल्पांतर्गत सौर ऊर्जेवर आधारीत लघु नळ
पाणी पुरवठा योजना राबविणेबाबत मार्गदर्शक सूचना.

**संचालनालय**

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

"भूजल भवन" शिवाजीनगर, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००५

Tel : २५५१३७१६/२५५१३७१७/२५५१३७१८, Fax :९१-०२०-२५५३३१०८ e-mail : cde.gsda@gmail.com

जा.क्र. आवेधन/कक्ष-२/स्वजल कार्यक्रम/पं.क्र. २७ / ८९७ /२०१९ , दिनांक :

## परिपत्रक

**वाचा -** १) पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. W-११०४४/१/२०१८-१९- Water-Part (१) दिनांक - ७ मार्च,२०१८

२) शासन निर्णय क्रमांक - स्वजल-२०१९/प्र.क्र.२५/पापु-१०, दि. २६ फेब्रुवारी, २०१९

३) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा परिपत्रक क्र. आवेधन/कक्ष-१/०.५ते २.५. HP संनियंत्रण/पंक्र३५/६४९/२०१८, दिनांक ३० ऑक्टोंबर २०१८

४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र. लपापु-२०१६/प्र.क्र.०६/पापु-१५ दिनांक २१ जानेवारी, २०१६

५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र. आपना-१०११/प्र.क्र.८७/ पापु-१५, दिनांक १३ एप्रिल २०११

६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र. ग्रापापु-५३१०/प्र.क्र.२१७/ पापु-१५, दिनांक २९ डिसेंबर २०११

७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र. ग्रापापु- १००१/प्र.क्र.३३०/ पापु-०७, दिनांक १४ फेब्रुवारी, २००२

पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार यांचेद्वारे स्वजल हा समुदाय आधारीत पथदर्शी प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार आणि वाशिम या आकांक्षित जिल्हयांमध्ये लोकसहभागातून गावाच्या मागणीनूसार स्वतंत्र गावाकरिता सौर उर्जेवर आधारीत लघु नळ पाणी पुरवठा योजना राबवावयाची आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजाणीकरिता राज्य शासनाच्या संदर्भ क्र. २ चे शासन निर्णयान्वये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस **राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणा** म्हणुन घोषित करण्यात आले आहे, तसेच जिल्हास्तरावर सौर उर्जेवर आधारीत दुहेरीपंप लघु नळ पाणी पुरवठा योजना राबविणारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखालील समिती, **जिल्हा स्वजल प्रकल्प समिती** म्हणुन घोषित करण्यात आली आहे.



Scanned by CamScanner

केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. १ पत्रान्वये स्वजल प्रकल्पाच्या तपशिलवार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यास अनूसरून महाराष्ट्र राज्याकरिता स्वजल प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## १. योजनेचे स्वरूप, निकष व कार्यक्षेत्र

१.१ सदर योजना आकांक्षित उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार आणि वाशिम जिल्हयांमध्ये राबवावयाची आहे.

१.२ सदर प्रकल्पांतर्गत स्वतंत्र वाडी/वस्ती/गाव करिता, जेथे विंधण विहिर/साधी विहिर/नैसर्गिक झरे यांना पुरेसे, सुरक्षित व शाश्वत पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहे, भूजलाकरिता व जमीनीवरील पाण्याकरिता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूजल अंदाजानूसार सुरक्षित पाणलोट क्षेत्रातील गाव/वाडी/वस्तीच्या ठिकाणी, गाव हागणदारीमुक्त (ओ.डी.फ.) आहे , ज्या ठिकाणी किमान १० घरांची वस्ती आहे, जेथे इतर नळ पाणी पुरवठा योजना अस्तित्वात नाही, ज्या गावाने योजनेकरीता विहित प्रस्ताव सादर केला आहे अशा ठिकाणी शक्यतो सौर उर्जेवर आधारीत लघु नळ पाणी पुरवठा योजना राबवावयाची आहे.

**१.३ आवश्यक उपांगे**

१.गावाची लोकसंख्या, विंधण विहीर / साधी विहीर / नैसर्गीक झरे यांची पाण्याची क्षमता विचारात घेवून नळ पाणी पुरवठा योजनेकरीता योग्य क्षमतेची सौरपंप प्रणाली. ( सौरपंप, सौर पॅनल, कंट्रोल पॅनल, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सेन्सर्स )

२. सौर पॅनल्सच्या सुरक्षेकरीता तारेचे कुंपण

३. उर्ध्वरण नलीका / वितरण प्रणाली

४. आवश्यकतेनुसार पाणी साठवण टाकीकरीता उंच मनोरा

५. पाणी साठवण टाकी

६. आवश्यकतेप्रमाणे नळ कोंडाळे,शाळा,अंगणवाडीस स्वतंत्र नळजोडणी , आवश्यकतेनुसार व मागणीनूसार घरोघरी स्वतंत्र नळजोडणीची व्यवस्था.

७. पेयजलाचा स्त्रोत शाश्वत ठेवणेकरीता भौगोलीक परिस्थिती नूसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या सल्ल्याने योग्य पाणी पुनर्भरणाची उपाय योजना

८. टोल फ्री क्रमांकासह योजनेच्या तक्रार निवारणाकरिता कस्टमर केअर सेंटर.



Scanned by CamScanner

९. नळकोंडांळ्यांजवळील वाया जाणा-या पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य ठिकाणी शोषखड्डे

### १.४ वैकल्पिक उपांगे

१. पेयजलाचा स्रोत रासायनीक दृष्ट्या गुणवत्ता बाधीत असल्यास पाण्यातील अतिरिक्त रासायनीक घटक निर्मुलीन सयंत्र.

२. ऑनलाइन क्लोरीनेशन / पाणी शुध्दीकरण युनीट

३. रात्रीच्यावेळेस पाणी घेणेकरिता आलेल्यांसाठी सौर उर्जेद्वारे बॅटरी चार्ज होणारे एल.ई.डी. दिवे

४. जनावरांकरिता पाण्याची टाकी.

५. विंधण विहिरीची पाणी पातळी, उत्सर्ग , गळती मोजण्याकरिता माहिती उपलब्ध करुन देणारे रिमोट मॉनिटरींग सेन्सर्स.

**१.५** सदर योजनेची आर्थिक मर्यादा प्रति प्रकल्प रु. ५०.०० लक्ष या मर्यादेत असेल, कोणत्याही परिस्थितीत योजनेचा खर्च रु. ५०.०० लक्ष पेक्षा जास्तीचा होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव प्राप्त झालेनंतर एक वर्षाच्या आत योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

## २ योजनेची उभारणी मार्गदर्शक तत्वे

संदर्भ ३ ते ७ अन्वये सौर ऊर्जेवर आधारीत नळ पाणी पुरवठा योजना राबविणेकरिता अनुक्रमे शासनाकडून तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. योजनेची तांत्रिक मान्यता, योजनेच्या उभारणीकरिता, योजनेच्या तांत्रिक बाबी, योजनेची तपासणी या करीता सदर मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात यावा.

## ३ योजना राबविणेची कार्यपद्धती

### ३.१ राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणा

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महराष्ट्र राज्य, पुणे राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणा** म्हणून खालीलप्रमाणे संनियंत्रणात्मक जबाबदारी पार पाडेल.

१ सदर योजना राबविणेस इच्छुक असलेल्या ग्रामपंचायतींकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेणेकरीता जाहिरात प्रसिध्द करणे, सूचना देणे.



Scanned by CamScanner

२. योजनेच्या माहिती प्रशिक्षण आणि संवाद (IEC) करीता ( प्रकल्पाचे उद्दीष्ट,भूमीका,व्याप्ती,कार्यपद्धती, गावाची जबाबदारी, भूमीका, सहभाग याबाबत जनजागृती करणे, सामाजीक लेखा परीक्षण, योजनेची अंमलबजावणी , देखभाल दुरुस्ती याकरिता लोकसभाग इत्यादी करीता) संस्थांचे पॅनल तयार करणे.

३. जिल्हा स्वजल प्रकल्प समिती कडून प्राप्त प्रस्ताव राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीस मान्यतेस्तव सादर करणे, राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीचा निर्णय संबंधित जिल्हयांना कळविणे.

४. मंजूर कृती आराखडयानुसार शासनाकडून प्राप्त झालेला निधी जिल्हयांना वितरीत करणे.

५. योजनेच्या भौतीक व आर्थिक प्रगतीचीचे संनियंत्रण करणे, माहिती संकलीत करुन शासनास सादर करणे.

६. योजनेच्या विविध उपांगांकरिता तांत्रिक तपशिल निश्चित करणे, मार्गदर्शक आदर्श अंदाजपत्रक तयार करणे, योजनेस आवश्यक साहित्यांचे दरनिश्चित करणे.

७. स्वजल प्रकल्पांतर्गत चांगले काम करणा-या ग्रामपंचायतींकरिता राज्यातर्फे बक्षिस समारंभ आयोजित करणे.

८. प्रकल्पा करिता प्राप्त व वितरितअनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्रे जिल्ह्यांकडून प्राप्त करुन घेणे व शासनास सादर करणे.

९. आवश्यक्तेनूसार अधिकारी/कर्मचारी/ग्रामस्थ यांचे क्षमता बांधणी करीता प्रशिक्षण घेणे, आयोजित करणे व त्यासाठी शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सपोर्ट फंडमधून निधी उपलब्ध करुन घेणे त्याचे जिल्ह्यांना वितरण करणे.

१०. योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार वेळोवेळी जिल्हयांना निर्देश देणे.

**<u>३.२.</u> जिल्हा स्वजल प्रकल्प समिती**

जिल्हा पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखालील सौर ऊर्जेवर आधारीत दुहेरी पंप योजनेच्या अंमलबजावणी करीता अस्तित्वात असलेली समिती जिल्हा स्वजल प्रकल्प समिती खालील प्रमाणे कार्य करेल.

१. प्रकल्पाच्या योजना निवडीच्या निकषानूसार ग्रामपंचायती निवडणे त्यांना प्रकल्प/ योजनेची माहिती अवगत करुन देणे. योजना अंमलबजावणीच्या सर्व स्तरावर त्यांना सहकार्य करणे.



Scanned by CamScanner

२. ग्रामपंचायतींकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करून ते राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणेस सादर करणे. ( प्राप्त प्रस्तावांची तपासणी सूची प्रपत्र ४ सोबत जोडले आहे )

३. लोकसहभागातून योजनेची संकल्पना व विकल्प निश्चित करणेकरीता जिल्हा स्वजल प्रकल्प समिती कडून प्राप्त प्रस्ताव तपासतांना ग्रामपंचायतीचा योजना राबविण्याचा पूर्वानुभव विचारात घ्यावा.ग्रामपंचायती त्यांच्या पूर्विच्या मालमत्तेची देखभाल/दुरुस्ती कशाप्रकारे करीत आहे हे विचारात घ्यावे. ग्रामपंचायती पाणी निधी बाबतचे लेखे कशाप्रकारे ठेवत आहे हे विचारात घ्यावे.

४. योजनेच्या अंदाजपत्रकानुसार भरावयाच्या १० % ग्रामपंचायत हिस्स्याची रक्कम व भविष्यातील देखभाल दूरुस्तीकरीता लोकवर्गणी ग्रामपंचायत जमा करीत आहे याची खात्री करणे .

५. योजनेच्या भौतीक व आर्थिक प्रगतीचीचे संनियंत्रण करणे, माहिती संकलीत करुन राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणेस सादर करणे.

६. योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान विविध भागधारकांचे वाद उद्‌भवल्यास त्याचे निराकरण करणे.

७. ग्रामपंचायत माहिती प्रशिक्षण आणि संवाद संस्थेच्या मदतीने सामाजिक लेखा परिक्षण अहवाल तयार करित असलेबाबत खातरजमा करणे.

८. गावाच्या माहिती प्रशिक्षण आणि संवाद व क्षमता बांधणी कामाकरिता सहाय्य करणे.

**३.३. जिल्हास्तरिय ग्रामिण पाणी पुरवठा योजना अंमलबजावणी यंत्रणा**

उप अभियंता ( यांत्रिकी ),यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परीषद, हे जिल्हास्तरिय ग्रामिण पाणी पुरवठा योजना अंमलबजावणी यंत्रणा म्हणून खालील प्रमाणे जबाबदा-या पार पाडतील.

१. सदर प्रकल्प राबविणेकरिता जेथे विंधण विहिर/साधी विहिर/नैसर्गिक झरे यांना पुरेसे, सुरक्षित व शाश्वत पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहे अशा भूजलाकरिता व जमीनीवरील पाण्याकरिता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूजल अंदाजानूसार सुरक्षित पाणलोट क्षेत्रातील गावे/वाडया/वस्त्या निवडीस सहाय्य करणे

२. योजनेचे संकल्पन करणेस, प्रपत्र भरणे, योजना निवडीचा ग्रामसभेचा ठराव तयार करणेस गावास सहाय्य करणे.( ग्रामसभा ठराव नमूना प्रपत्र १ सोबत जोडले आहे.)

३. योजनेकरिता आवश्यक तांत्रिक माहिती , पाण्याची गुणवत्ता, पाण्याचे स्त्रोत शाश्वत ठेवणेकरिता उपाययोजना याबाबत आवश्यक माहिती गावास व माहिती प्रशिक्षण आणि संवाद संस्थेस उपलब्ध करून देणे.



Scanned by CamScanner

४. योजना राबविणेकरिता येणा-या खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रकानुसार भरावयाच्या १० % लोकवर्गणीची रक्कम ग्रामपंचायतीस कळविणे.

५. प्राप्त प्रस्तावानूसार योजनांचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करणे . योजनेचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करतांना योजनेच्या ५ वर्षे देखभाल दुरुस्तीकरिता व प्रतिबंधात्मक दुरुस्तीकरिता आवश्यक साहित्याच्या खर्चासह येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक स्वतंत्र तयार करावे . केंद्र शासनाकडून केवळ योजनेच्या भांडवलीखर्चाकरिता अर्थ सहाय्य करणेत येइल. ( योजना देखभाल दुरुस्ती खर्चाचे विवरण नमूना प्रपत्र ३ सोबत जोडले आहे.)

६. उप अभियंता ( यांत्रिकी ),यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परीषद हे योजनेचे तपशिलवार अंदाजपत्रक , ग्रामपंचायतीचा ठराव, लोकवर्गणीकरिता व देखभाल दुरुस्तीकरिता उघडलेल्या बचत खात्याचा तपशिल इत्यादी माहिती जिल्हा स्वजल प्रकल्प समितीस प्रस्तावाची छाननीकरिता सादर करतील.

७. राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीच्या मंजूरी नंतर स्वजल प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार योजना राबविणेकरिता निविदाप्रक्रिया राबविणे.

८. सदर निविदाप्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत राबविण्यात येईल. महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियम पध्दतीने निविदाप्रक्रिया राबवून कार्यादेश देण्यात येतील याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

९. योजनेच्या प्रत्यक्ष उभारणीच्या वेळेस कामाचे पर्यवेक्षण करणे.

१०. योजना पूर्ण झालेनंतर त्याची चाचणी घेणे व योजना कार्यान्वीत करणे.

११. योजना कार्यान्वीत झालेनंतर ती ग्रामपंचायतीस हस्तांतर करणे, योजना पूर्ण झालेबाबत केंद्र शासनास अहवाल सादर करणे.

१२. जिल्हास्तरिय ग्रामिण पाणी पुरवठा योजना अंमलबजावणी यंत्रणा कंत्राटदाराची योजनेच्या अंदाजपत्रकाच्या १०% रक्कम राखून ठेवेल. सदर रक्कमेपैकी प्रतिवर्ष १ % याप्रमाणे रक्कम योजनेच्या पहिल्या , दुस-या व तिस-या वर्षी यशस्वी देखभाल दुरुस्ती झाली असल्यास , ३% व ४% रक्कम अनुक्रमे चौथ्या व पाचव्या वर्षी यशस्वी देखभाल दुरुस्ती झाली असल्यास संबधित कंत्राटदारास देण्यात येइल.

१३. योजनेच्या भविष्यातील देखभाल दुरुस्तीकरिता जिल्हास्तरिय ग्रामिण पाणी पुरवठा योजना अंमलबजावणी यंत्रणा , ग्रामपंचायत व कंत्राटदार या तीन भागधारकांचा ५ वर्षाचा देखभाल व दुरुस्ती करार करणे व भविष्यात त्याची योग्य अंमलबजावणी होत आहे याची खात्री करणे.



Scanned by CamScanner

१४. योजनेच्या तक्रार निवारणार्थ टोल फ्री कस्टमर केअर सेंटर प्रस्थापीत करणे/कार्यान्वित करणे. ग्रामपंचायतस्तरावर कंत्राटी तंत्रज्ञाकडून दुरूस्ती होणे शक्य नसल्यास , तक्रार प्राप्त झाले नंतर कस्टमर केअर सेंटर कडून योजना राबविणा-या संस्थेमार्फत योजनेची तात्काळ दुरुस्ती करुन घेण्यात येईल व ठरावीक मुदतीत योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरू करण्यात येईल.

जिल्हास्तरावर कस्टमर केअर सेंटरवरील खर्च राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सपोर्ट फंड निधी मधून उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

१५. योजनांची प्रगती आय.एम.आय.एस. संकेतस्थळावर अद्यावत करणे

सदर योजनांना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील अभियंत्यांमार्फत तांत्रिक मान्यता देण्यात येतील तसेच योजनांच्या गुणवत्तेबाबत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील अभियंत्यांचे संनियंत्रण राहील.

## ३.४ ग्रामपंचायतस्तर

१. राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणेमार्फत स्वजल प्रकल्पांतर्गत पाणी पुरवठा योजनेकरीता जाहीरातीद्वारे स्वारस्य मागविल्यावर जिल्हा स्वजल प्रकल्प समितीस ग्रामपंचायतीच्या ठरावासह प्रस्ताव सादर करणे.

२. ग्रामपंचायतीच्या प्रस्तावात ग्रामसभा घेवून योजनेकरीता आवश्यक जागा उपलब्ध करुन देत असलेबाबत, योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० % ग्रामपंचायत हिस्सा, योजनेच्या भविष्यातील देखभाल दूरुस्तीकरीता लोकवर्गणी ग्रामपंचायतीकरीता उपलब्ध होत असलेल्या निधीतून वसूल करणेबाबत ठराव देणे बंधनकारक राहील.

३. जिल्हा स्वजल प्रकल्प समितीकडून योजनेच्या अंदाजपत्रकानुसार भरावयाच्या १० % ग्रामपंचायत हिस्सा रक्कम व भविष्यातील देखभाल दूरुस्तीकरीता प्राप्त होणारी लोकवर्गणी भरणेकरिता राष्ट्रीयकृत बॅकेत दोन स्वतंत्र बचतखाते उघडणे व त्यात रक्कमा जमा करणे. भांडवाली खर्चाकरिता उघडण्यात आलेल्या व्याजाची रक्कम देखभाल दूरुस्तीकरीता उघडण्यात आलेल्या बचत खात्यात जमा करणे.

४. लोकसहभागातून व तांत्रिक सहाय्याने योजनेचे संकल्पन करणे, योजनेकरिता स्त्रोत निश्चित करणे, योजनेच्या विविध उपांगांकरिता ( सौर पॅनल, साठवण टाकी मनोरा, नळ कोंडाळे, उर्ध्वरण नलीका, वितरण प्रणाली, पाणी शुद्धिकरण संयंत्र, शोष खड्डा, पाउस पाणी पुनर्भरण इत्यादी ) जागा निश्चित करणे .

५. यशस्वीरित्या योजना कार्यान्वित झालेनंतर ती ताब्यात घेणे.

६. योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरुस्ती करिता तंत्रज्ञ नेमणे.

७. योजनेच्या नियमीत देखभाल दुरुस्ती करिता करार करणे.



Scanned by CamScanner

८. योजना कार्यान्वित ठेवणेकरिता उचित व्यवस्था करणे.

९. योजनेच्या देखभाल दुरुस्ती खर्चाचे लेखे ठेवणे , लेखा परिक्षण करणे.

**<u>३.५) माहिती प्रशिक्षण आणि संवाद संस्था</u>**

राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणेकडून नेमण्यात आलेल्या माहिती प्रशिक्षण आणि संवाद संस्था योजनेचे संकल्पन, योजनेकरीता स्त्रोत, योजनेच्या विविध उपांगांकरिता जागा निश्चिती, योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरिता लोकवर्गणीची तरतूद करणे ,योजना पूर्ण झालेनंतर ती हस्तांतरीत करून घेणे याकरिता ग्रामपंचायतीच्या सहाय्याने लोकजागृती करतील.

**४. <u>योजनेकरिता अनुदानाची तरतूद</u>**

४.१ सदर योजनेच्या अंमलबजावणीकरीता ४५% केंद्र हिस्सा व ४५% राज्य हिस्सा , राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून उपलब्ध होणा-या ५% फ्लेक्झी निधीतून शासनामार्फत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस प्राप्त होणा-या अनूदानातून जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्यात येइल. संबधित ग्रामपंचायतीकडून योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० % निधी लोकवर्गणीच्या माध्यमातून जिल्हास्तरिय ग्रामिण पाणी पुरवठा योजना अंमलबजावणी यंत्रणेस उपलब्ध करुन घेण्यात यावा.

४.२ ग्रामपंचायतीकडून प्राप्त होणारा भांडवली खर्चाच्या १० % निधी लोकवर्गणीच्या माध्यमातून किंवा ग्राम निधीतून किंवा १४ व्या वित्त आयोग निधीतून ( पंचायतीराज मंत्रालय,भारत सरकार यांचे पत्र क्र, DO # M-११०१५/२५५/२०१७-FD, दिनांक ६ सप्टेंबर २०१८ ) किंवा खासदार, आमदार निधी किंवा खणीज निधी किंवा सि.एस.आर. निधी किंवा जिल्हा परिषदेकडील निधी किंवा जिल्हाधिकारी यांचेकडील नाविन्यपूर्ण / इतर निधी इत्यादी माध्यमातून उपलब्ध करून घेता येईल. संबंधित (१०%) निधीबाबत त्या-त्या शासन निर्णयाचे काटेकोर पालन करावे.

४.३ योजनेच्या देखभाल दुरुस्तीवरील खर्च लोकवर्गणीच्या माध्यमातून तसेच ग्रामनिधीतून भागविण्यात यावा.

४.४ योजनेच्या देखभाल दुरुस्तीकरीता उप अभियंता (यां) यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद हे तांत्रिक मार्गदर्शन करतील.

४.५ सदर योजनेच्या अंमलबजावणीकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी १ % निधी राज्यस्तरीय कार्यान्वयन यंत्रणेस व ४ % निधी जिल्हास्तरीय कार्यान्वयन यंत्रणेस प्रशासकीय खर्चाकरीता अनुज्ञेय राहील. प्रशासकीय निधीचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा.



Scanned by CamScanner

१. कंत्राटी अभियंता / डाटाएंट्री ऑपरेटर यांचे मानधन, प्रवासभत्ते अदा करणे.

२. योजनेच्या सनियंत्रणात्मक पर्यवेक्षकीय कामाकरिता भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनावरील खर्च भागविणेकरीता

३. योजनेच्या सनियंत्रणात्मक कामाकरिता संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर, स्टेशनरी, झेरॉक्स, एल.सी.डी.प्रोजेक्टर इ.करीता होणारा खर्च .

४. योजनेकरिता उपलब्ध अनुदानाचे लेखा परिक्षण करणे.

उपरोक्त मार्गदर्शक सूचनांप्रमाणे स्वजल प्रकल्पांतर्गत सौर उर्जेवर आधारीत लघु नळ पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करावयाची आहे. पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार यांचेद्वारे स्वजल प्रकल्पा करिता वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

(श्री.कौस्तुभ दिवेगावकर,भा.प्र.से.)
संचालक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :- १. मा.अतिरिक्त मुख्य सचिव ,पाणी पुरवठा वस्वच्छता विभाग,मंत्रालय ,मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. मा.विभागीय आयुक्त , नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहितीस्तव सादर.
३. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार, वाशिम यांना माहितीस्तव.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार, वाशिम यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
५. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (वासो) बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव.
६. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहितीस्तव.
७. मुख्य खोदन अभियंता, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे / अमरावती यांना माहितीस्तव.
८. वरिष्ठ खोदन अभियंता, नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
९. उपअभियंता (यां.), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद, गडचिरोली, नंदूरबार, वाशिम यांना माहिती कार्यवाहीस्तव.





Scanned by CamScanner

प्रपत्र - (१)

## ग्रामसभा ठराव नमुना

मौजे ----------------- तालुका ---------------- जिल्हा ---------------- या गावामध्ये दिनांक ----------- रोजी ग्रामसभा घेण्यात येवून, स्वजल योजनेमध्ये सौर उर्जेवर आधारीत नळ पाणी पुरवठा योजना घेऊन गावास पाणी पुरवठा करण्याचे ठरले. याबाबत खालीलप्रमाणे ठराव घेणेत आला.

१. ही योजना उप अभियंता (यां) उपविभाग, जिल्हा परिषद ------------- यांचेमार्फत राबविण्यात यावी. योजनेसाठी आवश्यक जागा ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येईल.

२. योजनेच्या एकूण भांडवली खर्च रकमेच्या १० % रक्कम लोकसहभाग म्हणुन भरण्यात येईल.

३. या योजनेची देखभाल दुरुस्तीसाठी ३ वर्षासाठी येणारा खर्च लोक सहभागातून स्वतंत्र खात्यामध्ये भरण्यात येईल.

४. वैयक्तिक, घरोघरी पाण्याचे पाईपची नळ जोडणी ग्रामपंचायतीच्या खर्चामधून करण्यात येईल.

दिनांक -

ठराव क्रमांक -

सूचक नाव -

अनुमोदक नाव -



Scanned by CamScanner

प्रपत्र (२)

**योजनेचे संकल्पन करीता गावक-यांची माहिती.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | | अर्जदाराची माहिती | |
| | १. | अर्जदाराचे / सरपंचाचे / ग्रामसेवकाचे नाव | |
| | २. | भ्रमणध्वनी / दूरध्वनी क्रमांक | |
| | ३. | ई-मेल | |
| २ | | संपूर्ण पत्ता | |
| | १. | वस्तीचे नाव | |
| | २. | गावाचा सेन्सेस नंबर | |
| | ३. | ग्रामपंचायतीचे नाव (LGD) | |
| | ४. | तालुका | |
| | ५. | जिल्हा | |
| ३. | | संपर्क अधिकारी (ग्रामसेवक) | |
| | १. | नाव | |
| | २. | हुद्दा | |
| | ३. | भ्रमणध्वनी | |
| | ४. | ई-मेल | |
| | ५. | ग्रामपंचायत बँकखाते क्रमांक | |





Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | | वस्तीची सद्यस्थिती | |
| | १. | लोकसंख्या | |
| | २. | एकूण घरे | |
| | ३. | पिण्याच्या पाण्याकरिता संपूर्ण हातपंपावर आधारित आहेत का ? | होय / नाही |
| | ४. | अंशत: हातपंपावर आधारित आहे. | होय / नाही |
| | ५. | पाणी गुणवत्ताबाधित आहे. | होय / नाही |
| | ६. | अस्तित्वातील पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन (न.पा.पु.यो.) | होय / नाही |
| ५. | | योजनेच्या जागेची माहिती | |
| | १. | योजनेचे ठिकाण | |
| | २. | गावाचे नाव | |
| | ३. | सर्व्हे नंबर | |
| | ४. | एकूण क्षेत्र | |
| | ५. | जमीन मालकाचे नाव | सरकारी / खाजगी |
| | ६. | वस्ती व उद्भवामधील अंतर | कि.मी.-- |
| | ७. | योजनेसाठी रस्ता | कच्चा / पक्का |
| ८ | | उद्भवाचा प्रकार | जमीनीवर / (तलाव, झरे इ.) / जमीनीखाली (साधीविहीर, विंधन विहीर, टूयबवेल) |
| ९ | | ग्रामपंचायतचा ठराव जोडला आहे का ? | होय / नाही |





Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १० | | लोकसहभाग | |
| | १. | ठराव घेतल्याचा दिनांक | |
| | २. | स्वजल योजनेची माहिती लोकांना देण्यात आली का / समितीस समजली का / | होय / नाही |
| | ३. | लोकांनी सूचविलेल्या नळ कोंडाळयांची संख्या व ठिकाण | |
| | ४. | घरगुती नळ जोडणी घेणार आहेत का | होय / नाही |
| | ५. | घेणार असल्यास प्रति नळ जोडणी अनामत रक्कम | रु. |
| | ६. | मासिक पाणीपट्टी दर | रु. |
| | ७. | सरकारी जागा उपलब्ध नसल्यास योजनेसाठी खाजगी जागा देण्यास तयार आहेत का ? | होय / नाही |
| | ८. | असल्यास खाजगी मालकाचे नाव व क्षेत्र | |
| | ९. | ३ वर्षाचा देखभाल दुरुस्ती खर्च देणार आहेत का ? | होय / नाही |

Scanned by CamScanner

प्रपत्र (३)

## योजनेचा देखभाल दुरुस्ती खर्चाचे विवरण - नमुना

| अ.क्र. | गृहीतके | जमा रुपये |
|---|---|---|
| १. | शासनाने ठरविलेला पाणीपट्टीचा किमान दर प्रती वर्ष | रु. २००/- |
| २. | घरांची संख्या | ३० |
| ३. | पाणीपट्टी प्रतीवर्ष रु. २००/- प्रमाणे ३० घरासाठी = (३०X२००) | रु. ६,०००.०० |
| ४. | वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च भांडवली खर्च २ % प्रमाणे ( भांडवली खर्च रु. --- x -- %) | खर्च रुपये |
| ५ | रु. ५.०० लाख भांडवली खर्च असलेल्या योजनेचा देखभाल दुरुस्ती खर्च | |
| ६. | पाणी पुरवठा कर्मचा-याचा पगार प्रतिमहिना रु. ५००/- प्रमाणे वार्षिक खर्च (५०० x १२ ) | रु. ६,०००.०० |
| ७. | पंप, पॅनल, नळकोंडाळे, पाईपलाईन, TCL पावडर / खर्च २ % प्रमाणे - (५,००,००० x ०.०२) | रु. १०,०००.०० |
| ८ | एकूण देखभाल दुरुस्ती खर्च | रु. १६,०००.०० |
| ९ | ३ वर्षाकरिता देखभाल दुरुस्तीखर्च | रु. ४८,०००.०० |
| १० | लोकसहभाग (पाणीपट्टीद्वारे उत्पन्न) (तीन वर्षाकरीता) ( ६००० x ३) | रु. १८,०००.०० |
| ११ | उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीकडून (४८०००-१८०००) | रु. ३०,०००.०० |



Scanned by CamScanner

प्रपत्र (४)

## प्राप्त प्रस्तावाची तपासणी सूची

| | | |
|---|---|---|
| १. | अंदाजपत्रक | आहे / नाही |
| २. | तांत्रिक मंजूरी (सक्षम अधिकारी यांची मान्यता) | आहे / नाही |
| ३. | अंदाजपत्रकात भांडवली खर्च व देखभाल दुरुस्ती खर्च स्वतंत्रपणे नोंदवला आहे. | होय / नाही |
| ४. | अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५० लाखाचे मर्यादेत आहे. | आहे / नाही |
| ५. | १० % लोकवर्गणी भरली आहे / नाही, रक्कम भरल्याचे बँक पासबुक सत्यप्रत. | आहे / नाही |
| ६. | जागेचे बक्षिसपत्र सोबत जोडले | आहे / नाही |
| ७. | जागेचे उपलब्धतेबाबतचे प्रमाणपत्र. | होय / नाही |
| ८. | योजनेचे संकल्पचित्र / स्रोत / पॅनल उभारणी जागा / टाकी उभारणी जागा / नळ कोंडाळेचे स्थळ दर्शविणारा व स्रोत व उपांगे यामधील अंतर दर्शविणारा नकाशा सोबत जोडला आहे. | होय / नाही |
| ९. | लोकसहभाग जमा रक्कम व ग्रामपंचायतीची हिस्सा रक्कम (देखभाल दुरुस्ती करीता) विवरणपत्र | आहे / नाही |
| १० | राष्ट्रीय बँकेमध्ये खाते खोलुन त्यात ३ वर्षाचा देखभाल दुरुस्ती खर्च जमा केला / नाही | आहे / नाही |



Scanned by CamScanner